**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ याची जबानी**

मी याव्दारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – बाबासाहेब बन्सी भोसले

माझे वय ६१ वर्षे व्यवसाय सेवानिवृत्त

राहणार श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर

**<u>अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत.</u>**

१. दिनांक ०२.०८.२०२० रोजी मी अकोले पोलीस ठाणे येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी पोलीस निरीक्षक श्री.जोंधळे यांचे लेखी आदेशान्वये गु.र.नं.३३३/२०२० चा तपास माझ्याकडे वर्ग झाला. आता मला तो आदेश दाखविला. तो आदेश तोच आहे. त्या आदेशावर पोलीस निरीक्षक श्री.जोंधळे यांची सही आहे. मी त्यांचे सोबत काम केल्यामुळे त्यांची सही मी ओळखतो. त्या आदेशातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी–२३** देण्यात आली. त्या आदेशासोबत मला फिर्याद, एफ.आय.आर.ची प्रत, दैनिक अहवाल व पंचनामा ही कागदपत्रे प्राप्त झाली. मी त्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. मी संबंधित साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली. मी मुद्देमाल पावती तयार करून गुन्हयातील मुद्देमाल संबंधित कारकून यांचे ताब्यात दिला. आता मला ती मुद्देमाल पावती दाखविली. ती पावती तीच आहे. त्या पावतीवर माझी सही आहे. ती सही मी ओळखतो. त्या पावतीतील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी–२४** देण्यात आली.

३. मी तहसिलदार, अकोले यांना पत्र देवून गुन्हयातील मुद्देमाल वाळू ताब्यात घेण्याबाबत व पुढील कार्यवाही करणेबाबत विनंती केली. आता मला त्या पत्राची स्थळप्रत दाखविली. ती स्थळप्रत अस्सलबरहुकूम आहे. त्या पत्रावर माझी सही आहे. ती सही मी ओळखतो. त्या पत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास

**निशाणी पी–२५** देण्यात आली.

**४.** तपासाअंती गणोरे, ता.अकोले, जि.अहमदनगर येथील आढळा नदीच्या पात्रातून आरोपी हा विनापरवाना व बेकायदेशीरित्या वाळूची चोरी करून ती वाळू वाहतूक करीत असताना मिळून आल्याने मी त्याचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी आरोपी हा न्यायालयासमोर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.पोखरकर यांचे मार्फत–**

**५.** हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला कथित वाळूची चोरी करताना अगर वाहतूक करताना पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत: आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल वाळू जप्त केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत: कथित घटना घडलेल्या ठिकाणाचा पंचनामा केलेला नाही. आरोपीने कथित वाळू कोठून चोरली, याचा मी तपास केलेला आहे. मी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने महसूल खात्याने कारवाई केली आहे. महसूल खात्याने कारवाई केल्याबाबतचे पत्र मी याकामी दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, गौण खनिजांबाबत कारवाई करण्याचे अधिकार फक्त महसूल विभागाला आहेत. साक्षीदार सांगतो की, तसे अधिकार पोलिसांना देखील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी दाखल केलेल्या फोटोमध्ये वाळू दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्या ठिकाणाहून कथित वाळूची चोरी झाली, त्या ठिकाणाचे फोटो काढलेले नाहीत.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा वाळूची चोरी करीत असताना व वाहतूक करीत असताना मिळून आला, असे माझ्या तपासात निष्पन्न झाले, हे मी खोटे सांगत आहे. एक ब्रास म्हणजे १०० घनफूट होय. फिर्यादीत नमूद ज्या

ड्रायव्हरमार्फत कथित वाळू पोलीस स्टेशनला आणली, त्या ड्रायव्हरचे तपास टिपण मी नोंदविलेले नाही. माझ्याकडे दिनांक ०२.०८.२०२० रोजी या गुन्हाचा तपास वर्ग झाल्यानंतर तपास चालू असल्याने मी दिनांक ०८.०८.२०२० रोजी तहसिलदार यांना पत्र दिले. तो ट्रॅक्टर व ट्रॉली पोलीस स्टेशनला कसे आणले, याबाबत मला व्यक्तीश: माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा मिळून आलेला नसताना आरोपीला त्रास देण्याच्या उद्देशाने मी त्याचेविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात केलेली सर्व कथने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.16 16:57:42 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**दिनांक – १६.०३.२०२६**